# रात्री दीड वाजता पब, बार बंद करण्याची सूचना

## रेस्टॉरंट असोसिएशनकडून चिंता

**पुणे, ता. १ :** शहरातील पब, बार, रूफटॉप हॉटेल रात्री दीड वाजता बंद करावीत, अशा स्पष्ट सूचना पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्या आहेत. दरम्यान, आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) उद्योगासाठी लावलेल्या नियमांबाबत हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने (वेस्टर्न इंडिया) चिंता व्यक्त करत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.

पोलिस आयुक्त कुमार यांनी शहरातील पब, बार, रूफटॉप हॉटेल, रेस्टॉरंटचालकांची बुधवारी (ता. २८) बैठक घेतली. राज्य सरकारच्या नियमानुसार पब, बार, रूफटॉप हॉटेल रात्री दीड वाजता बंद करावेत. बार आणि पब चालकांनी या नियमांचे पालन करावे, अशा सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या. रेस्टॉरंटला रात्री अकरापर्यंत मुदत आहे. परंतु रेस्टॉरंटसला त्रास देऊ नये, अशी सूचना पोलिसांना केली. तसेच शहरातील 'नाईट लाईफ'वर नियंत्रण ठेवण्यासाठी या परिसरात कलम १४४ लावण्यात आले आहे. याबाबत १५ दिवसांत हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पोलिस आयुक्तांच्या या निर्णयाबाबत हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (वेस्टर्न इंडिया) च्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, पर्यटनमंत्री गिरीश महाजन आणि प्रधान सचिव (पर्यटन) जयश्री भोज यांना निवेदन देण्यात आले आहे. "हा आदेश अन्यायकारक असून, शहरातील पर्यटन, आदरातिथ्य उद्योगावर दूरगामी आणि हानिकारक परिणाम होऊ शकतात. उद्योगात काम करणाऱ्या सुमारे दहा टक्के लोकसंख्येचा उदरनिर्वाह धोक्यात येण्याची भीती आहे," अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे संघटनेचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी सांगितले.

Pune, Pune-Today
02/03/2024 Page No. 102